E 542

THE

# SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

## STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

# षड्दर्शनचिंतनिका.

6542

## मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.


पुस्तक १. मे १८७७. अंक ५.

Vol. 1, May, 1877. No. 5.

पुणें.

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे. )


NAWAB SALAR JUNG BAHADUR.

Truth is not local.

The following gentlemen will receive subscriptions for us.

Anna Moreshwar Kunte B. A., M. D., Esqr., Bombay.

Rao Saheb Mahiput Rao Rupram, Principal Training College, Ahmedabad.

Rao Saheb Gopal Govind Ghate, Sub-judge Kotree, Sindha.

Govind Moreshwar Hasubnis Esquire, B. A. Sanskrit Teacher High School, Baroda.

**२४. प्रकरणविचार चालूं असतां संभव असतांहि अपकर्षाची योजना करूं नये. (कारण) अपकर्षास योजिलें असतां प्रकरणास बाध येतो, आणि विधिवाक्य अनर्थक होतें. ( सि० यु० २. )**

24. In the course of a particular topic (under discussion), a word or phrase which occurs late should not be anticipated, ( because) such a procedure obstructs the course of a topic, and an original statement is (then) to no purpose. (2. Argument in support of the last final statement.)

---

शब्दाचा पोटभेद स्तुतिशब्द आहे. आणि स्तुतिशब्दाचे पोटभेद अर्थवाद, गुणवाद, हेतुवाक्य, आलंकारिक वाक्य, इत्यादि आहेत. पुन: मुळ सूत्रांत अनुगम करण्याची युक्ति योजिली आहे, तिचा विचार केला पाहिजे. कांहीं कांहीं स्थळीं अमुक अर्थ दिसून येतो, तोच अर्थ सर्व स्थळीं दिसून येतो. हा सामान्य अर्थ व्यापक होतो, म्हणून दुसऱ्या सर्व स्थळीं तोच अर्थ दिसून येतो. असा या अनुगमपद्धतीचा सामान्य आकार आहे. त्याचा विशेष विचार केला पाहिजे. पहिल्या पादांतील चवथ्या सूत्रावरील टीप पहा. तेथें उपलक्षणन्यायाचें निरूपण केलें आहे. या सूत्रीं उपलक्षणाचे योगानें अनुगम केला आहे. या वाक्यास विधिवाक्य म्हणावें, कीं स्तुतिवाक्य म्हणावें, अशी पंचाईत पडते, म्हणून पूर्वपक्षकार काय करावें ? असें विचारतो. ही पंचाईत मिटण्यास जैमिनीनें एक तोड काढली आहे. ज्या ज्या स्थळीं विधिवाक्यांतून सबळ आणि निर्बाध अपूर्व अर्थ निघत नाहीं, त्या स्थळीं तें विधिवाक्य

*Stuti* is to be considered. *Stuti* includes a direct subordinate statement, an indirect subordinate statement, a causative statement, figures of speech and sometimes even censure. Then what is the distinction between *Stuti* and *Shesa*? The term *Shesa* has a wider sense than *Stuti*, for the first applies to an action, a quality, a substance, a person; while *Stuti* is a subdivision of *Shesa*, and a direct subordinate statement, an indirect subordinate statement and the rest are subdivisions of *Stuti*. In the sûtra, a method of generalizing is laid down. Whatever is observed to exist in *some places* may exist in *all places*. Phenomena, observed to exist sometimes or in some places may be universal as to time or place. We have thus stated the general form of this method which deserves to be specially considered. See the footnote on (I. 1, 4.) where we have explained the method of generalizing from one instance called Upalaksana. In this sûtra, another method is employed. The opponent asks in the course of the discussion in the sûtras whether a particular statement is original

नव्हे, पण स्तुतिवाक्य आहे, असें समजावें. सूत्राच्या या दलानें विशेष लक्षांत ठेवण्या जोगा शास्त्रार्थ सांगितला आहे. तो असा:—ग्रंथाचा अर्थ करतांना विधिवाक्य म्हणजे प्रधानवाक्य कोणतें हें अर्थी ठरवावें. आणि असें ठरविण्यास कोणता उपाय योजावा, हें हि सांगितलें आहे. ज्या वाक्यांत अपूर्व वर्णन केलें असतें, तें विधिवाक्य. केन्हां केन्हां स्तुतिवाक्यांतहि अपूर्व वर्णन असतें. आतां निर्णय कसा करावा? ज्यांतून एकदम अपूर्व अर्थ निघतो, अशीं एका स्थळीं दोन वाक्यें आढळलीं असतां ज्यांत स्वातंत्र्यानें अपूर्व वर्णिलें असतें, तें विधिवाक्य, आणि या विधिवाक्याशीं दुसऱ्या वाक्याचा कांहींना कांहीं सम्बन्ध असतो. या संबंधामुळें तें दुसरें वाक्य मुख्य विधिवाक्यावर अवलंबतें, म्हणून त्याला स्तुतिवाक्य समजावें. असा या सूत्राच्या प्रथम दोन दलांचा अर्थ झाला. वरील शास्त्रार्थ सामान्य कल्पून अन्यस्थळीं अशीच योजना करावी, असें तिसऱ्या दलामध्यें वर्णिलें आहे. तैत्तिरीय संहितेंतील (५.३,१२.) एथील वेदवाक्याचा अर्थ. "आणि पाण्यामध्यें अश्व उत्पन्न होतो, अथवा पाण्यामध्यें वेत्र उत्पन्न होतो." या स्थळीं "पाण्यांत उत्पन्न झालेल्या घोड्याचें" विधान करणारें विधिवाक्य संभवत नाहीं. ज्या स्थळीं विधीचा असंभव, त्या स्थळीं स्तुतीचा संभव, अशी कल्पना योग्य आहे.

२४. या सूत्रांत "अपकर्ष" आणि "प्रकरण" असे दोन शब्द विचार करण्याजोगे आहेत. प्रकरण म्हणजे अमुकच

or subordinate, and what is the characteristic mark by which the one can be distinguished from the other. To answer this quesion, Jaimini explains a principle in this sûtra. Wherever a statement is not essentially original, it is only subordinate. This part of the sûtra explains what deserves special attention :—in interpreting a passage, it is first necessary to determine what the principal sentence or the original statement is. To enable an interpreter to determine this, Jaimini explains a method. The principal sentence is one which makes an original statement. The objection of the opponent is that a subordinate statement sometimes expresses originality. To remove this objection, it is laid down that what expresses originality independently and absolutely is to be considered the principal sentence in a passage to be interpreted, as it bears a relation to phrases or other sentences. On account of this relation, the other sentences or phrases depend on the principal sentence, and are, therefore, subordinate. This is the explanation of the first two parts of this sûtra. The third part lays down that these principles are to be generally applied. The mantra in the Taittirîya Sanhitâ (V. 3, 12.) is translated here. "And a horse is born in waters or a sort of rush is produced in waters." In this place, an original statement that "a horse born in waters is to be taken" is simply impossible. Therefore, wherever an original statement is impossible, a subordinate statement is possible.

24. The two terms *Apakarsa*—and *Prakarana*—used in this sû-

विषय चालू आहे, असें निरनिराळ्या अर्थांच्या परस्परसंबंधावरून ज्ञान होतें. आणि प्रकरणांत वर्णिलेले अर्थ एकामागून एक अमक्याच संबंधानें आले पाहिजेत अशी अवश्यकता असते. संबंधानें एकामागून एक येणें ह्यास आनुपूर्वी म्हणतात. प्रकरणांत आनुपूर्वी आणि साकांक्षत्व हे धर्म असलेच पाहिजेत.

प्रकरणाच्या या विचारावरून अपकर्षशब्दाचा अर्थ सुबोध होईल. आनुपूर्वीकडे आणि सांकाक्षत्वाकडे लक्ष न देतां वाक्यांतील पुढचा अर्थ मागें आणला म्हणजे अपकर्ष होतो. आतां सूत्रार्थ सहज समजेल. कांहीं एक प्रकरण चाललें आहे. तेथें अपकर्ष संभवतो असें वाटलें, म्हणजे पुढच्या वाक्यांतील अर्थ मागल्या वाक्यांत योजला तरी चालेल, असें वाटलें, तथापि असें करूं नये. कां? असें केलें असतां आनुपूर्वी बिघडते, साकांक्षत्व धर्माची हानि होते, प्रकरणास बाध येतो. ज्या स्थळीं प्रकरण किंवा अप्रकरण याचा विचार रहात नाहीं त्या ठिकाणीं विधिवाक्याची योग्यता राहिलीच नाहीं. विधिवाक्य निरर्थक झालें. अशी खटपट करून स्तुतिवाक्य प्रधान आहे, असें करण्याबदलां तें गौण आहे हें पत्करावें हें ठीक. वेदवाक्याची योजना केली असतां हा अर्थ अधिक स्पष्ट होतो. यज्ञसमयीं कणकीचे पोपे निरनिराळ्या खापराच्या चकत्यावर भाजतात. ह्या खापराच्या चकत्यांस संस्कृतांत कपालें म्हणतात, आणि त्या पोप्यांस पुरोडाश म्हणतात. तैत्तिरीय संहिता (२.६,३.) या

tra call for special explanation. *Prakarana* or a topic is the knowledge which is produced by the relations which the different thoughts of a discourse bear to one another. The nature of a topic (*Prakarana*) necessitates a particular order and sequence of thoughts of which a discourse consists. The particular sequence whether of letters, words or thoughts is called in Sanskrita *Ânupúrvi.* Sequence and the principle of *desirability* (Sâkânsatva) are the essential elements of a topic. The principle of *desirability* is the principle of what is called grammatical government considered from a subjective point of view. Now it will be easy to explain the meaning of what is called *Apakarsa.* When the principles of sequence and *desirability* being disregarded, a word, a phrase or a thought which occurs in the latter part of a discourse is transferred to its former part, such a transference involves the principle of *Apakarsa.* The meaning of the sûtra will be now easy enough. In the course of a discourse, the principle of the *inverse transference* (Apakarsa), though thought to be reasonable, is not to be employed, because it affects the sequence of thoughts, and annuls the principle of *desirability,* and obstructs the course of a topic. Where the course of a discourse is disregarded, an original statement loses its importance. It is simply to no purpose. All these efforts on the part of the opponent to raise the importance of a subordinate statement is simply waste of time and energy. It is reasonable to acknowledge its de-

सूत्राणि.

**विधौ च वाक्यभेदः स्यात् ॥२५॥ (सि० यु० ३)**

**पदानि।** (स्तुतिः) विधौ, च, वाक्य-भेदः, स्यात् ॥

**पदार्थः।** वाक्यभेदः=वाक्यस्य भेदः=वाक्यद्वयम् । अवशिष्टानि पदानि स्पष्टानि ॥

**वाक्यार्थः।** पुनः । स्तुतेर्विधिकल्पनायां वाक्यभेदो भवेत् ॥

**भावार्थः।** पूर्वमीमांसाविषये वाक्यभेदो दुष्ट इति सिद्धान्तः । सिद्धान्तोऽयं द्वितीयाध्यायस्य प्रथमपादे विचारयिष्यते । वाक्यभेदरूपदोषं गृहीत्वाऽत्र दोषापत्तिः कृता। यदि स्तुतिर्विधिस्तर्हि-वाक्यभेदः प्राप्नुयात् । वाक्यभेदोऽनिष्टोऽतः स्तुतिर्न विधिः ॥

वेदवाक्यान्यनुसंधेयानि ॥

औदुम्बरो यूपो भवति । इत्यादीनि ॥

---

ठिकाणचा मंत्र घेतला आहे. या अनुवाकाकडे विशेष लक्ष द्यावें. प्रथम असें वर्णन आहे कीं "ऋषींनीं पुरोडाश कूर्म (कांसव) झाला आहे, आणि (जमीनीवर) सरकूं लागला आहे, असें पाहिलें; आणि ते ऋषि त्याला म्हणाले." या ठिकाणीं पुरोडाश कूर्म कसा झाला, आणि तो सरकूं कसा लागला, या विषयीं वाचकांनीं विचार करावा. परंतु याच पुरोडाशाच्या निरनिराळे पोप्यांचें जें वर्णन केलें आहे, त्याचा या ठिकाणीं विचार व्हावयाचा आहे. "जो पोपा कांहीं भाजला आहे व कांहीं कच्चा आहे, तो राक्षसांना प्रिय आहे; जो न भाजला आहे तो रुद्राला प्रिय आहे; जो चांगला भाजला आहे तो देवांना प्रिय आहे. म्हणून कांहीं भाजल्या आणि कांहीं कच्चा अशा पुरो-

pendence. Much light will be thrown on this explanation by applying the principles discussed to a Vaidika passage. See the mantra quoted from the Taittirîya Sanhitâ (II. 6,3.) and translated. This part of the Sanhitâ deserves attention. It first describes that the *Risis* saw a cake (made of wheat and baked on cowherds) assuming the form of a tortoise, and moving (on the land); and the *Risis* said to it. Our readers may well enquire how a cake assumed the form of a tortoise and how it moved on the land. But the supernatural despises all reasonable enquiry. Now the different parts of the cake (Puro*d*âsha) baked on different cowherds are to be considered. "The part half baked and half not baked is liked by the Râksasas (demons). The part not baked at all is liked by the Rudra. The part

**२५. (स्तुतिवाक्य) विधिवाक्य (आहे) अशी कल्पना केली असतां वाक्यभेदरूप दोष येतो. (सि० यु० ३.)**

**25. If a subordinate statement be considered an original statement, (then) there is the defect of the division of a sentence. (3. Argument in support of the final statement.)**

---

डाशास न करणाऱ्या पुरुषानें पुरोडाश पक्का भाजावा, तो देवाला प्रिय आहे." हेतुवाक्यांत "म्हणून" इत्यादि शब्दांनीं जें कारण सांगितलें आहे, त्या कारणामध्यें "अशा पुरोडाशास न करणाऱ्या" एवढ्या पदांचा "राक्षसांना प्रिय" याकडे अन्वय केला असतां वांकडा अन्वय होऊन अपकर्ष उत्पन्न होतो. दर्शपूर्णमासी या यज्ञामध्यें राक्षसांचा अंश नाहीं. मग असला विधि भलतीकडेच लागूं लागेल. आणि जें प्रकरण चाललें आहे, त्यास बाध येईळ. म्हणून अपकर्ष करून स्तुतिवाक्यांतला कांहीं अंश विधिवाक्यांत घेऊं नये, स्तुति आणि विधि हे स्वतंत्र ठेवावेत. या करितां स्तुतिवाक्यांत आणि विधिवाक्यांत भेद आहे.

२५. दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादाच्या ४६ आणि ४७ सूत्रांत वाक्यभेदरूप दोष तो काय याचा विचार केला आहे. याच पादाच्या एकोणिसाव्या सूत्रावरचे टिपेंत ज्या वेदमन्त्राचें भाषांतर दिलें आहे, तें पहावें. त्या मन्त्राच्या प्रारंभीं "उंबराच्या झाडाचा यज्ञस्तंभ असतो" हें विधिवाक्य आहे. आणि त्याच मन्त्राच्या अंतीं "बलाच्या प्राप्तीकरितां" अशीं पदें आहेत. हें स्तुतिवाक्य आहे.

fully baked is liked by the gods. The sacrificer who does not partly bake a cake and partly leave it unbaked, should therefore bake the cake thoroughly (as) it is liked by the gods." If in the last causative sentence, the adjectival sentence —who does not bake the cake thoroughly—were connected with the demons already mentioned, it would be a case of *inverse transference* (*Apakarsa*) for in the full-moon sacrifice, there is no offering to the demons. Then there would be an original statement enjoining what is evidently absurd. The course of the discourse in the Sanhitâ would be ignored. It is therefore, necessary not to introduce a part of a subordinate statement into an original principal statement by means of what is called *inverse transference.* An original statement is to be considered as independent and is not to be mixed up with a subordinate statement. Thus an original statement is distinct from a subordinate one.

25. The exegetical defect based on the division of a sentence is examined by Jaimini in the sûtras (II. 1, 46-47.) Our readers will kindly refer to the translation of the Vaidika text in the foot-note to the 19th sûtra. In the beginning of the text, the original statement. "A sacrificial post is

सूत्राणि.

## अथ हेतुवन्निगदाधिकरणम् ॥

### हेतुर्वा स्यादर्थवत्त्वोपपत्तिभ्याम् ॥ २६ ॥ (पू०)

**पदानि** । ( स्तुतिः) हेतुः वा, स्यात्, अर्थवत्त्व–उपपत्तिभ्याम् ॥

**पदार्थः** । हेतुः=कारणम्, वा=पुनः, स्यात्=(स्पष्टम्) अर्थवत्त्वोपपत्तिभ्याम्=अर्थवत्त्वंच उपपत्तिश्च=अर्थवत्त्वोपपत्ती ताभ्याम् । अर्थवत्त्वम्=अर्थवतोधर्मः । अर्थवत्=यस्यार्थोस्ति तत् । तस्य धर्मो=अर्थः । अर्थवत्त्वम् तर्हि=स्वतंत्रोर्थः । उपपत्तिः=(टिप्पनी द्रष्टव्या)

**वाक्यार्थः** । पुनः । वाक्यसम्बन्धेनार्थविचारादुपपत्तेश्च स्तुतिस्तु हेतुर्भवेत् ॥

**भावार्थः** । अर्थवादस्य हेतुत्वेन ग्रहणम् । कुतः । वाक्यार्थविचारेणोपपत्त्या च स्तुतिवचनानां हेतुता प्राप्नोति । इति पूर्वपक्षः ॥

वेदवाक्यान्यनुसन्धेयानि ॥

शूर्पेण जुहोति तै० ब्रा० [१.६,९.] तेन ह्यन्नं क्रियते ॥

---

एक विधिवाक्य आणि दुसरें स्तुतिवाक्य अशी व्यवस्था न करतां आणि "बलाच्या प्राप्तीकरतां" या स्तुतिवाक्यास विधिवाक्य मानलें असतां वाक्यभेदरूप दोष उत्पन्न होतो, म्हणजे कारण नसतां एका वाक्याचीं दोन वाक्यें केलीं असें पत्करावें लागतें. म्हणून स्तुतिवाक्य आणि विधिवाक्य ही कल्पना चांगली आहे.

of the fig-tree," occurs; and at the end of the same text, the words—"for getting strength"—occur. The last is an abridged subordinate sentence. Now if instead of the first being the original statement and the last, a subordinate statement, the last were considered to be an original statement, then there would be the defect called the division of the same statement that is, without any special cause one statement is split up into two independent statements. It is, therefore, reasonable to distinguish an original statement from a subordinate statement.

**ज्या निगदांत कारणाचें वर्णन असतें, त्यांचा विचार.**

**२६. नाहीं. तें हेतुवाक्य, कारण ( हेतुवाक्याच्या अंगीं ) अर्थवत्त्व आणि उपपत्ति हे दोन धर्म असतात. (पू०)**

The subject of the *Nigadas* (texts of the Yajurveda) which are causative.

26. No, it is a causative statement, because (a causative statement has) independent signification and (power of) explanation. (Statement of the opponent.)

---

२६ या सूत्रांत "अर्थवत्त्व" आणि "उपपत्ति" हे दोन शब्द विचार करण्या जोगे आहेत. प्रथम अर्थवत्त्वशब्द घेऊं. ज्याला अर्थ आहे, तें अर्थ-वत्. या स्थळीं अर्थवत् हें धर्मी आहे आणि अर्थ हा त्याचा धर्म आहे. आतां, अर्थवत्त्व म्हणजे अर्थवत् या धर्मीवर राहणारा धर्म आहे. पुनः वाक्यहि अर्थवत् होईल. आणि वाक्यावरला धर्म वाक्यत्व हा आहे. वाक्यत्व म्हणजे अर्थ होईल. थोडा सूक्ष्म विचार आहे. वाचकांनीं लक्ष द्यावें. वाक्यत्व हें नानाधर्मांच्या समूहाचें नांव आहे. त्यामध्यें अर्थ, विचार, रचना, अशा अनेक धर्मांचा समावेश होतो. म्हणून जैमिनीनें वाक्य हा शब्द योजला नाहीं. अर्थवत्त्व म्हणजे धर्मधर्मिसंबंधानें केवळ अर्थ असें निष्पन्न होतें. हेतुवाक्य स्वतंत्र समजावें, कारण हेतुवाक्याच्या अंगीं स्वतंत्र अर्थ असतो. उपपत्तिशब्दाचा विचार केला पाहिजे. न्यायशास्त्रांत या विचाराचें माहात्म्य मोठें आहे. काणादीय वैशेषिक दर्शनाची चिंतनिका करतांना उपपत्तीविषयीं विशेष विवेचन करूं. एथें फक्त उपपत्तीचें

26. The terms *Arthavattva* and *Upapatti* in this sûtra call for special explanation. First, *Arthavat* is that which has *Artha*. In this case, *Arthavat* has for its quality, *Artha*. In other words signification is the quality of the significant. Now a sentence may be *significant*, and a sentence has the quality of the general nature of a sentence or the quality of its belonging to the genus of sentences. A mark of the genus—a sentence,—will be signification. This is a nice distinction which deserves the attention of our readers. The genus—a sentence,—as based on its nature, is an assemblage of many marks including signification, syntactical arrangement, and the sequence of thoughts. Therefore, the genus—a sentence—does not denote only one mark—signification. The genus (a sentence) is called Vâkyatva in Sanskrita. Hence the last term is not used by Jaimini in the sûtra. Again *Arthavattva* is the quality of the significant. *Arthavattva* is, therefore, the same as *Artha* or signification. Then why is this confused phraseology employed by Jaimini? The answer is—*Artha* (signification) is essentially different from *Arthavattva*. The first may be a

## सूत्राणि.

### स्तुतिस्तु शब्दपूर्वत्वादचोदना च तस्य ॥ २७ ॥

**पदानि** । [हेतुः] स्तुतिः, तु, शब्दपूर्वत्वात्, अ-चोदना, च, तस्य ॥

**पदार्थः** । शब्दपूर्वत्वात्=पूर्वंगतः शब्दः=शब्दपूर्वम् । तस्य धर्मः=शब्दपूर्वत्वम् तस्मात् । अचोदना=यद्वाक्यमविधायकं तत् । [अवशिष्टानि पदानि स्पष्टानि]

**वाक्यार्थः** । न । हेतुः स्तुतिः पूर्वविधिवर्णनात् । पुनः । हेतोश्चोदनाशक्तिर्नास्ति । [प्रसज्यप्रतिषेधोऽयम् ]

**भावार्थः** । हेतुप्रतिपादकं वाक्यं स्तुतिर्भवति । कुतः । यस्य विधेर्हेतुः स विधिः पूर्वमेव विद्यते । पुनः । हेतुप्रतिपादकवाक्यस्य विधायकत्वशक्तिर्नास्ति ॥

---

स्वरूपकथन केलें म्हणजे पुरे. दोन अर्थांचा साहचर्यसंबंध असला म्हणजे त्यांतील एकास कारण व दुसऱ्यास कार्य असें म्हणतात, आणि व्याप्य कोण व व्यापक कोण यावरून कार्यकारणभाव बहुधां बसवितां येतो, परंतु आनुगमिक सिद्धांत करतांना कार्यकारणभावाचा निश्चय करावा लागतोच, परंतु तेवढ्यानेंच सिद्धांतविचार पुरा होत नाहीं. विचार करणाऱ्याच्या मनाची तृप्ति होत नाहीं. विचार समजला पण उमजला नाहीं असें वाटतें. अशा प्रसंगीं त्या विचाराची फोड करणारी आणि त्याची व्यवस्था लावणारी जी एखादी कल्पना स्मरण्यांत येते त्या कल्पनेचें नांव उपपत्ति. यास दृष्टांत. विजेमागून घडघडाट होतो हें सर्वांस ठाऊक आहे, आणि वळवाच्या पावसामध्यें वीज होते हेंहि सर्वांस ठाऊक आहे.

mark out of the many marks which a genus denotes: the last is essentially the mark of what is significant. We have translated *Arthavattva* by independent signification. The opponent argues that a causative statement is independent, because it possesses independent signification. Now, the examination of the sense of the term *Upapatti*,—a subject of special importance in logic. In discussing the philosophy of Kanâda, *Upapatti* will be particularly examined. We will here indicate only the general nature of *Upapatti*. When two phenomena invariably follow one another or invariably co-exist, one of them is a cause and the other, an effect. This relation is fixed by the examination of the relation between the pervading and non-pervading phenonemena—called respectively Vyâpaka and *Vyâpya*. In establishing a general proposition,

**२७. पुनः हेतुवाक्य स्तुतिवाक्य, कारण विधिवाक्याचें वर्णन पूर्वी असतें. आणि हेतुवाक्याच्या अंगीं चोदनाशक्ति नाहीं. (सि०)**

**27. Again, a causative statement is a subordinate statement because it follows an original statement, and a causative statement cannot enjoin (any duty on man.) (Final statement.)**

---

विजेचा आणि वळवाच्या पावसाचा कार्यकारणसंबंध आहे. पुनः घडघडाटाचा आणि विजेचा कार्यकारणसंबंध आहे. यावरून जेव्हां होतो तेव्हां विजेमागून नेहमी घडघडाट होतो ही व्याप्ति सर्वांस मान्य आहे. आणि वळवाच्या वेळीं वीज होते हीहि व्याप्ति सर्वांस मान्य आहे. परंतु आपल्या मनाची समजूत पाडून घेण्याकरतां मुलें हि कल्पना करतात, आणि शेतकरीहि कल्पना करतात. ह्या कल्पनेला वास्तविक उपपत्ति म्हणावें. दोन धर्मावरून हेतु काय हें कळतें. यांतला एक धर्म अर्थवत्त्व, आणि दुसरा उपपत्ति. अर्थवत्त्व म्हणजे स्वतंत्र अर्थ आणि स्वतंत्र अर्थाविषयीं जी कल्पना ती उपपत्ति. दृष्टांताकरतां वेदवाक्य पहावें. "सुपानें याग करतो, कारण त्याच्या योगानें अन्न सिद्ध होतें." तै० ब्रा० (१.६,५.) या स्थळीं जें कारण वर्णिलें आहे, तें कारण हेतु आहे. कारण "त्याच्या योगानें अन्न सिद्ध होतें" हें वाक्य स्वतंत्र आहे. जर सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून त्यानें याग करावा असा संबंध बसविला, तर लांकडानें अन्न सिद्ध होतें, म्हणून त्यानें याग करावा असें प्राप्त होईल. म्हणून हेतुवाक्य हें स्वतंत्र वाक्य आहे, असा पूर्वपक्षाचा आशय आहे.

the relation of a cause to an effect requires to be determined. But this alone cannot establish a general proposition. The mind of a thinker is not satisfied. A general proposition is simply laid down, but its nature is not perceived. At this stage of the investigation, a theory which analyzes the general proposition into its elements and discovers their relation with one another is called Upapatti which corresponds to *explanation* in philosophy. An illustration. It is well-known that thundering follows the lightning which flashes during the irregular monsoons. The lightning and the irregular monsoons are connected as cause and effect. Again, thundering and the lightning are connected as cause and effect. Hence the universal propositions, that the rumbling of thunders in every case follows the lightning and that the lightning flashes only during the irregular monsoons are generally known and recognized. But every body—even children and cultivators—seeks to see how this takes place, and to propose a theory. Such a theory is called *Upapatti* or *explanation.* A causative statement is defined in the sûtra, and its elements and properties are pointed out. One of them is independent signification, and the other is *expla-*

## सूत्राणि.

**व्यर्थं स्तुतिरन्याय्येति चेत् ॥ २८ ॥**

केचित् सूत्रमिदं न सूत्रत्वेन वर्णयंति । किन्तु भाष्यत्वेन ॥

**भावार्थः** । निष्प्रयोजने हेतौ तस्य स्तुतित्वेन ग्रहणमयुक्तिकं । कुत इति पृष्टं चेदुत्तरसूत्रं द्रष्टव्यम् ॥

---

२७. मूळ संस्कृत सूत्रांत "शब्दपूर्वत्व" आणि "चोदना" अशीं दोन पदें आहेत. (१.१,२.) या सूत्राच्या टिपेंत चोदनाशब्दाच्या अर्थाविषयीं विचार केला आहे. आतां शब्दपूर्वत्व याचा विचार केला पाहिजे. "शब्दपूर्व" म्हणजे ज्यांत शब्द पूर्वी गेला आहे तें. शब्दपूर्वावरील धर्म शब्दपूर्वत्व. शब्द म्हणजे विधि असा येथें अर्थ आहे. या स्थळीं शब्दपदाच्या अर्थाकडे विशेष लक्ष द्यावें, कारण मीमांसाशास्त्रामध्यें शब्द नित्य आहे अशा कटाक्षानें शब्दपदाचा उपयोग होतो. वैदिक विधीला शब्द कां म्हणावें असें विचारावेंसें वाटतें. त्याचें उत्तर इतकेंच कीं, मूळ ध्वनिरूप शब्द आहे. त्याचे पोटभेद वैदिक शब्द, लौकिकशब्द, नगाऱ्याचा शब्द, वायूचा शब्द असें मानतां येतील. परतु वैदिक शब्द याविषयीं विशेष माहात्म्य वाटून त्यास शब्द अशी संज्ञा दिली आहे. विधि पूर्वी असतो, आणि मागून हेतु येतो, हें एक कारण आणि हेतूच्या अंगीं चोदना शक्ति नसते, हें दुसरें कारण. या दोन कारणांमुळें हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे.

*nation.* The Vaidika text quoted in Sansk*r*ita by way of illustration is to be examined. "He sacrifices by a winnowing basket because food is prepared by it," occurs in the Taittirîya Brâhma*na* (I. 6, 5.) The reason introduced by *because* in the above text is a *Hetu,* for the sentence—"because food is prepared by it" has independent signification. Because food is prepared by a winnowing basket, therefore, it is the means of a sacrifice. Then fuel is used in preparing food, therefore, it will be proper to sacrifice by means of fuel. But this cannot be permitted. Therefore, a causative statement has independent signification and is introduced to explain another statement with which it is not connected either as cause or effect. The opponent argues that a causative statement is not connected in any way with an original statement.

27. In the Sansk*r*ita sûtra, the terms Shabda-pûrvatva and Chodanâ are used. The sense of the last is examined in the footnote to the sûtra (I. 1, 2.) Now the term Shabda-pûrvatva has to be considered. Shabda-pûrvatva is the property of the *Shabda-pûr-*

**२८. हेतुवाक्यांत (स्तुतीचें) प्रयोजन नसलें म्हणजे त्याला स्तुतिवाक्य मानावें हा अन्याय आहे, असें म्हटलें तर. (सिद्धांतावर आशंका.)**

28. If it be said that it is unjust to consider a causative statement to be a subordinate statement as it does not describe an original statement, then—(An objection against the final statement in the 27th sûtra.)

---

२८. कोणी या सूत्रास स्वतन्त्र सूत्र मानतात, आणि कोणी यास भाष्यामध्यें मोडतात. परंतु हें स्वतन्त्र सूत्र मानलें असतां बरें. कारण येणेंकरून पुढील सूत्रास अवतरण होतें. सूत्राचा अर्थ स्पष्ट आहे. त्याचा एकंदर सारांश इतकाच कीं स्तुतीचें जें कार्य तें हेतुवाक्य करीत नाहीं. मग हेतुवाक्यास स्तुतिवाक्य कां म्हणावें ? अशी उत्थापित आशंका काढली आहे. इचें समाधान पुढले सूत्रांत आहे.

*va* which means that which is preceded by a word (Shabda) which means in this discussion an original statement (Vidhi). The term S*habda* deserves special attention, for it is used in the Pûrva-Mîmânsâ in the sense of the *eternal word.* We are inclined to enquire why a Vidhi(a scriptural injunction) should be called *a word.* Originally a word is a sound which is divided into Vaidika or sacred, profane, that of a drum, and that of wind. The general term—word(Shabda)—is used in the sense of a scriptural injunction by way of pre-eminence, as it were to proclaim its importance. The reason why a causative statement is to be considered subordinate is that it follows an original statement. The second reason is that it cannot enjoin any duty. On account of these two reasons, a causative statement is a subordinate statement.

28. This is considered by some to be an independent sûtra. Others think that this is a part of a commentary interpolated into the body of the Mîmânsâ. But it would be well if this were considered an independent sûtra, because it introduces and elucidates the next sûtra. The gist of this sûtra is that a causative statement does not perform the func-

सूत्राणि.

**अर्थस्तु विधिशेषत्वाद् यथा लोके ॥ २९ ॥**

**पदानि** । (तस्य=हेतोः) अर्थः, तु, विधि-शेषत्वात्, यथा, लोके ॥

**पदार्थः** । विधिशेषत्वात्=विध्युपोद्बलकत्वात् । (अवशिष्टानि पदानि स्पष्टानि)

**वाक्यार्थः** । पुनः हेतोरर्थोऽस्ति । हेतोर्विध्युपोद्बलकत्वग्रहणात् । लोकेऽपि पद्धतिरेषा दृश्यते ॥ यथा लौकिकव्यवहारेषु मुख्यार्थप्रतिपादनात् सिद्धान्ताद् हेतुर्भिद्यते तथा वैदिकेषु वाक्येषु विधेर्हेतुर्भिद्यते तयोर्भेदे गृहीते वाक्यार्थः सम्भवति नत्वन्यथा ॥

---

tion of a subordinate statement. Then Jaimini himself asks why a causat[illegible] stat[illegible]ment should be called a subor[illegible]nate statement. This question is answered in the following sûtra.

**२९. नव्हे. विधिवाक्याचें शेषवाक्य होणें हेंच हेतुवाक्याचें प्रयोजन आहे. (आणि) लौकिकव्यवहारांतहि असाच प्रचार दिसून येतो. (आशंकानिरास.)**

29. No, the purpose of a causative statement is to describe fully an original statement, (and) in common life, such a practice is observed to exist. (The objection removed.)

---

२९: मूळ संस्कृतसूत्रामध्यें "विधिशेषत्व" हें पद विचार करण्याजोगें आहे. शेषशब्दाची व्याख्या (१.२,२२–२३.) सूत्रांच्या टिपेंत केली आहे. परार्थाच्या म्हणजे दुसऱ्याच्या उपयोगीं जें जें पडतें, त्याचें नांव शेष. विधिवाक्याचे उपयोगीं हेतुवाक्य पडतें, विधिवाक्याचे अर्थास दृढता आणतें, विधिवाक्याचा अर्थ खुलवितें, आणि त्यामध्यें गोडी उत्पन्न करतें, म्हणून हेतुवाक्य परतंत्र आहे. आणि विधिवाक्य स्वतंत्र आहे. आतां, अहो पूर्वपक्षकार, हेतुवाक्याला विधिवाक्य आपण म्हणतां हें कसें? हेतुवाक्याचे धर्म निराळे, विधिवाक्याचे धर्म निराळे. विधिवाक्य प्रधान असून स्वतंत्रतेनें नवीन अर्थ वर्णन करतें, आणि हेतुवाक्य गौण असून परतंत्रतेनें सांगितलेल्याच अर्थाला दार्ढ्य आणतें. असा भेद असतां तुम्ही दोन्ही एकच म्हणतां हें सयुक्तिक नाहीं. पुनः तुम्ही असें म्हणतां कीं सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा. पण सुपानें याग करावा कां? अन्न सिद्ध होतें म्हणून ना? मग ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा. लांकडानें अन्न सिद्ध होतें म्हणून लांक-

---

29. The term *Vidhi-shesatva* in the Sanskrita sûtra deserves to be considered. The term *Shesa* is explained in the foot-notes to the sûtras (I. 2, 22-23.) Whatever serves the purpose of others is called *Shesa.* A causative statement serves the purpose of an original statement : the first strengthens and enlarges the sense of the last, by rendering it acceptible. Therefore, a causative statement is dependent, while an original statement is independent. Jaimini now asks the opponent why he considers a causative statement to be the same as an original statement, as the properties of the one differ from those of the other. An original statement is both principal and independent and expresses what is entirely unkown, while a causative statement is both subordinate and dependent and only adds to the force of what is already known. Such being the distinction between the two, it is simply unreasonable to assert their identity. Again, it is said by the opponent that "one should sacrifice by means of a winnowing basket because food is prepared by it." But a winnowing basket is used in a sacrifice simply because it is the means of preparing food. Then whatever is the means of preparing food

सूत्राणि.

**यदि च हेतुरवतिष्ठेत निर्देशात् सामान्यादिति चेत्**
**अव्यवस्था विधीनां स्यात् ॥ ३० ॥ (सि० यु०)**

**पदानि ।** (स्तुतिः) यदि, च, हेतुः, अवतिष्ठेत, निर्देशात्, सामान्यात्, इति, चेत्, अ-व्यवस्था, विधीनाम्, स्यात् ॥

**पदार्थः ।** अवतिष्ठेत=व्यवस्थाविशिष्टः स्यात् । निर्देशात्=विशेषप्रतिपादनात् । सामान्यात्=जात्यभिप्रायेण । अव्यवस्था=व्यवस्था-हानिः ॥

**वाक्यार्थः ।** यदि स्तुतिर्हेतुस्तर्हि विशेषप्रतिपादनाद् व्यवस्थाविशिष्टो भवेत् । हेतोर्जात्यभिप्रायेण ग्रहणं चेद् विधीनां व्यवस्था-हानिः स्यात् ॥

**भावार्थः ।** पूर्वपक्षकाराचार्ययोरस्मिन् वादे विशेषो वर्त्तते । स विशेषः कः । अर्थवादानां विधिहेतुता चेद् यस्य यस्य हेतुता प्राप्नोति तस्य तस्य ग्रहणमापतेत् । शूर्पेण जुहोतीत्याकारकस्य विधे रूपान्तरं भवेत् । दर्व्या जुहोतीत्यापतेत् । निर्दिष्टविधेस्तर्हि व्यवस्थाहानिः स्यात् । अव्यवस्थाप्रसङ्गः प्राप्नुयात् । अव्यवस्थाप्रसङ्गोऽनिष्टः । अत एव शूर्पेण जुहोति तेन ह्यन्नं क्रियत इत्याकारकविधौ व्यक्त्यभिप्रायेण विधिनिर्दिष्टहेतोर्ग्रहणम् । न तु जात्यभिप्रायेणेति सूत्राशयः । अव्यवस्थाप्रसङ्गमुद्दिश्य ब्रवीति कुमारिलभट्टः । तस्मादलंहेतुत्वेन । स्तुतित्वमेव वरमिति ॥

---

ह्यानें याग करावा, असें आपण बोललांच आहां. (१.२,२६.) सूत्रावरील टीप पहा. पण असा प्रकार नाहीं. रामा कृष्णाला आणि हरीला कुस्तींत पाडतो, असें म्हटलें म्हणजे कृष्णा आणि हरी यांच्यापेक्षां रामाचें बल अधिक आ-

should be used in a sacrifice. Hence fuel is to be the means of a sacrifice. This statement the opponent makes in the foot-note to the sûtra (I. 2, 26.) But fuel cannot be the means of a sacrifice. Take an illustration from common life. Râmâ beats *Krisnâ* as well as Hari in a wrestling

**३०, आणि जर स्तुतिवाक्य हेतुवाक्य आहे असें म्हटलें तर (एवढ्याच)वर्णनानें विधिवाक्याची व्यवस्था होईल. पर्याप्तिसंबंध आहे म्हटलें तर सर्व विधींची अव्यवस्था होईल. (सि० यु०)**

30. If a causative statement be considered a subordinate statement in a particular relation, then an original statement can be (properly) adjusted. If the relation of adequateness be asserted, all original statements will be unsettled. (An argument in support of the final statement.)

---

हे, इतकेंच सिद्ध झालें. तर हें सोडून सर्व ब्रम्हांडावर रामाचें बल अधिक झालें असें म्हणणें साजेल काय? कधीं साजणार नाहीं. तसेंच सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा हें वर्णन केवळ सुपाचें आहे. यास फांटे फोडून ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा असें व्यापक वचन असयुक्तिक आहे, आणि लौकिकव्यवहारविरुद्ध आहे. हेतुवाक्याचा कटाक्ष केवळ विधिवाक्याचें परोचन करण्यावर असतो. विधिवाक्यामध्यें आणि हेतुवाक्यामध्यें पर्याप्तिसंबंध नसतो. पर्याप्तिसंबंध म्हणजे सर्व प्रकारें आणि सर्व स्थळीं त्या कारणानें तेंच कार्य उत्पन्न व्हावें. जसें रामा लंगडतो, कारण तो काल पडला. परंतु वायूची बाधा झाल्यानें रामा लंगडेल, करट झाल्यानें रामा लंगडेल, पाय बधिर पडल्यानें रामा लंगडेल, आणि पडल्यानेंहि रामा लंगडेल. पुनः पडल्यानें लंगडा न होतां हात मोडून घेईल. यामुळें जो जो पडतो तो तो लंगडतो असा पर्याप्तिसंबंध सिद्ध होत नाहीं. इतकेंच

match. Hence it is only to be inferred that Râmâ excels *Krisnâ* and Hari in strength. But it cannot be said that Râmâ excels the whole world in strength. To say so is simply absurd. It is simply the description of a winnowing basket to state that food is prepared by means of it. This statement can not be developed into the universal proposition that whatever prepares food is the means of a sacrifice, and is opposed to all experience in life. A causative statement simply enlarges the signification of the principal statement. The relation between an original statement and a causative statement is not that of *adequateness* of cause and effect called *Paryâpti*. *Adequateness* insists on the same cause invariably producing the same effect. Take an illustration. Râmâ limps because he fell yesterday; but he may limp if affected by rheumatism. Again Râmâ may limp if a boil breaks out on his leg or if his leg be benumbed. He limps because he fell yesterday. But instead of getting his leg hurt, he may get his arm injured. Therefore, there is no invariable sequence between limping and falling as

कीं "रामा लंगडतो" आणि "कारण तो पडला" अशीं दोन वाक्यें आहेत. त्यांपैकीं पहिलें विधिवाक्य व दुसरें हेतुवाक्य.

३०. मूळ संस्कृत सूत्रांत जीं "सामान्यात्" "अव्यवस्था" आणि "निर्देश" अशीं पदें आहेत त्यांचा थोडासा विचार केला पाहिजे. सामान्य आणि विशेष हीं सापेक्ष पदें आहेत. सामान्य म्हणजे जाति, विशेष म्हणजे व्यक्ति. पण सामान्यशब्दाचा विशेष अर्थ आहे तो मागील सूत्रावरील टीप पाहिली म्हणजे लक्षांत येईल. तेथें पर्याप्तिसंबंधाचें वर्णन केलें आहे. सामान्य या पदापासून पर्याप्तिसंबंधाचा बोध होतो. हेतुवाक्यामध्यें आणि विधिवाक्यामध्यें पर्याप्तिसंबंध मानिला असतां शास्त्रांमध्यें किंवा वेदांमध्यें जितकीं म्हणून विधिवाक्यें आहेत तितक्यांची अव्यवस्था होईल. आतां "व्यवस्था" या शब्दाचा अर्थ काय हा विचार करणें आहे. प्रत्यक्ष प्रमाणाच्या आधारानें अथवा अमुकच गोष्ट अमक्याच स्थितींत असावी अशीं सर्वमान्य अनुमानें यांच्या अनुरोधानें जें जें काय आहे त्यां त्यांवर व्यवस्था हा धर्म अढळतो. व्यवस्थेच्या अभावास अनवस्था असें शास्त्रीय पद आहे. आणि अनवस्थाप्रसंग हा शास्त्रीय विचारांत मोठा दोष आहे असें मानिलें आहे. अनवस्थाप्रसंगाचें एक उदाहरण देतों, म्हणजे व्यवस्था पदाचा अर्थ लक्षांत येईल. पृथ्वीचा आधार काय ? तर शेषाहि. शेषाहीचा आधार काय असें विचारीत गेलें तर अमुकच ठिकाणीं थांबावें असें न समजतां सर्व विचारांची अव्यवस्था हो-

the cause—falling—does not invariably produce the effect—limping. There are two statements:—Râmâ limps and because he fell yesterday. The first is an original statement and the second—a subordinate statement. That is, the last explains the first.

30. The term *Sâmânyât, Avyavasthâ* and *Nirdesha* in the original Sanskrita sûtra are to be examined. The terms Sâmânya (a generality) and *Vishesa* (a particularity) are correlative. But the special sense of the term *Sâmânya* as used in this discussion is explained in the foot-note to the preceding sûtra as the phrase—*adequateness of cause and effect* is explained in it for a generality is used in these sûtras in the sense of adequate causal relation, when the same cause invariably produces the same effect. When such a relation (Paryâpti-sambandha) is recognized between causative sentences introduced by such words as *because* or *for* and the principal sentence (an original statement) the syntactical arrangement of the last will be unsettled. The next question is what is the meaning of the term—adjustment (Vyavasthâ) as used in the sûtra. Adjustment, arrangement or order is found to be a property of that, the conditions of the existence of which are determined by sensuous perception or by correct inferences drawn from correct premises, and acknowledged to be such by persons able to judge of the subject. The absence of such an adjustment is called *Anavasthâ* or *non-adjustment.* A case of *non-adjustment* (Anavasthâ-prasanga) is well-known to the language of Indian philosophy. It is consi-

रून जाईल. अशा प्रकारच्या अव्यवस्थेस अनवस्थाप्रसंग म्हणतात. निर्देश म्हणजे स्पष्टपणें विशेष वर्णन करून जें सांगितलें असतें तें. या ठिकाणीं निर्देशशब्दाचा अर्थ विशेष असा घ्यावा. विशेष आणि सामान्य हे सापेक्ष धर्म आहेत असें सांगितलेंच आहे. आतां एकंदर सूत्रार्थाचें निरूपण करतां येईल. हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें जर म्हटलें तर हें विशेष वर्णन होतें येणेंकरून हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची व्यवस्था लागते. हेतुवाक्य सामान्य आहे असें म्हटलें तर हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची अव्यवस्था होते, म्हणून हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें म्हणावें. "सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा." या वेदमंत्रामध्यें सुपानें अन्न सिद्ध होतें हें केवळ सुपाचेंच विशेष वर्णन आहे. आणि सुपानें याग करावा हा विधि यजमानाच्या मनांत भरावा इतकेंच त्याचें पर्यवसान आहे. सुपानें अन्न सिद्ध होतें या हेतुवाक्याचा सामान्य अर्थ असा केला कीं ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें तें तें समजावें, तर विधिवाक्यांत कांहींच तात्पर्य नाहीं असें निष्पन्न होईल; म्हणजे ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा, असें प्राप्त होईल. लांकडांनीं अन्न सिद्ध होतें म्हणून लांकडांनीं याग करावा, पाण्यानें अन्न सिद्ध होतें म्हणून पाण्यानें याग करावा, असें कल्पिलें असतां मूळ वेदविहित विधिची वाताहत झाली. या वाताहतीचेंच नांव अव्यवस्था. याकरितां अशी अव्यव-

dered to be a serious defect in logical reasoning to be compelled to admit that a proposition stated is a case of *non-adjustment.* An illustration will simplify the explanation. On what does this earth rest? The reply is—on the hood of a huge serpent. On what does the serpent rest? If such questions be repeated *ad infinitum,* there can be no finality in this investigation. The want of finality under such circumstances is a case of *non-adjustment.* Now the term *Nirdesha* means a specific statement made in so many words. But in the sûtra under consideration, it appears to mean a simple particularity as opposed to a generality. We have already stated that a particularity and a generality are correlative terms. Now the ground for offering an explanation of the sûtra is prepared. When a subordinate sentence is called a causative sentence, it is a particular statement which adjusts the relation between a causative sentence and the principal sentence in a passage. When a causative sentence is considered to be a general statement expressive of the invariable relation of a cause to an effect, the adjustment of the relation of the principal sentence in a passage is disturbed. A causative sentence is, therefore, a subordinate sentence. In the Vaidika text, "he sacrifices by a winnowing basket, because food is prepared by it," the latter portion of the passage introduced by *because,* is simply a special description of a winnowing basket, and its function is to induce a sacrificer to use a winnowing basket in a sacrifice. If the sentence that "food is pre-

सूत्राणि.

## अथ मन्त्रलिङ्गाधिकरणम् ॥

### तदर्थशास्त्रात् ॥ ३१ ॥ (पू० १.)

**पदानि** । तत् , अर्थ-शास्त्रात् ॥

**पदार्थः** । तत्=त्रिंशसूत्रस्थावतिष्ठेतपदनिदर्शनम् । अर्थः=प्रयोजनम्=विनियोगः । शास्त्रात्=शासनात्=निबन्धनात् । अर्थशास्त्रात्=विनियोगप्रदर्शनात् ॥

**वाक्यार्थः** । विधीनां व्यवस्था भवेद् विनियोगप्रदर्शनेन । मन्त्राणामर्थज्ञानं विना विनियोगः कर्तुं शक्यते । कुतः । विनियोगप्रदर्शकं शास्त्रमस्ति । अतो मन्त्राणामुच्चारमात्रेण कार्यं भवति । विनियोगस्योक्तत्वात् । मन्त्रार्थो न ज्ञेयः । इति पूर्वपक्षः ॥

**भावार्थः**। "नन्वर्थवादार्थं भविष्यतीति चेत् । नहि । येन विधीयते तस्य वाक्यशेषोऽर्थवादः । इत्युक्तम् । नच निरपेक्षेण विहितेऽर्थवादेन किञ्चिदपि प्रयोजनं क्रियते । अतो नार्थवादार्थं वचनमिति" शबरः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

उरु प्रथस्वोरु ते यज्ञपतिः प्रथतां ॥ तै. सं. (१.१,८.) उरु प्रथस्वोरुते यज्ञपतिः प्रथतामित्याह । यजमानमेव प्रजया पशुभिः प्रथयति ॥ तै. ब्रा. (३.२,८.) इमामगृभ्णन्रशनामृतस्य ॥ तै. सं. (४.१,२) इमामगृभ्णन् रशनामृतस्येत्यश्वाभिधानीमादत्ते ॥ (ब्राम्हणरूपा) तै. सं. (५.१,२.) एकोनचत्वारिंशसूत्रादपकर्षोयम् ॥

---

स्था भास होऊं नये म्हणून जें हेतुवाक्य तें स्तुतिवाक्य असें जैमिन्याचार्य म्हणतात. हेतुवाक्याविषयीं इतका विचार झाला.

pared by it" be interpreted into a general statement in—"whatever is the means of preparing food;" this will render the principal sentence—he sacrifices by a win-

## *आतां येथून मंत्रलिंगाविषयीं विचार.

**३१. ( वेदमंत्र अनर्थक आहेत) कारण त्यांचा अर्थ (कर्मविनियोगरूपानें ) बांधलेला आहे. (पू० १.)**

* मंत्रलिंग हे शब्द अधिकरणांत आले आहेत, जेणेंकरून वेदमन्त्राचें विशेष वर्णन होतें, ते मन्त्रलिंग. मन्त्राचा विनियोग कसा करावा यावर मन्त्रलिंगशब्दाच्या अर्थाचें पर्यवसान आहे.

३१. सूत्राचा अर्थ–मूळ सूत्रांत "तदर्थ" आणि "शास्त्र" अशीं दोन पदें आहेत. तदर्थ म्हणजे तोच आहे अर्थ ज्यांचा. तोच म्हणजे 'व्यवस्था' या शब्दाचें वर्णन मागील टिपेंत केलें आहे. अर्थ म्हणजे प्रयोजन व्यवस्थारूप प्रयोजन ज्याचें आहे तें. व्यवस्थारूप प्रयोजन म्हणजे विनियोग. अमक्या मंत्राची अमक्या कर्मांत योजना करावी असें दाखविणें हा तदर्थशब्दाचा अर्थ झाला. शास्त्र म्हणजे व्यवस्थित विवेचन. आतां सूत्राचा आशय सांगतां येईल. वेदमन्त्राचा उपयोग कर्मामध्यें कसा करावा याचें पूर्ण व्यवस्थित विवेचन ब्राम्हणकल्पसूत्रांत केलें आहे, म्हणून वेदमन्त्राचा अर्थ समजून घेण्याची अवश्यकता नाहीं म्हणजे वेदमन्त्र निरर्थक आहेत. इतका सूत्राचा अर्थ आहे हें पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे. आणि त्याचा आशय असा आहे कीं नुस्ता

## * Now the subject of the practical application of the Vaidika texts.

31. (The Vedas are to no purpose), because their sense is definitely explained in(otherpractical works) (1. Statement of the opponent.

nowing basket—useless,and to no purpose for the last statement is —whatever is the means of preparing food is the means of a sacrifice. Fuel is the means of preparing food, therefore fuel is the means of a sacrifice. Again, water is the means of preparing food, therefore, water is the means of a sacrifice. Such an interpretation entirely sets aside the original scriptural injunction—a circumstance which is called a case of non-adjustment. To avoid such perplexity and illogical reasoning, Jaimini insists on a causative sentence being considered a subordinate sentence. The nature of a causative sentence is thus examined.

* The phrase *Mantra-linga* occurs in the above statement of the subject. Whatever explains particularly a Vaidika text is a *Mantra-linga,* the signification of which results in the practical application of Vaidika texts.

31. Now the explanation of the 31st sûtra in which the terms *tadartha* and *shâstra* are used. The first means *that* which has *artha.* Now *that* is tantamount to adjustment (Vyavasthâ) which is explained in the preceding footnote. Secondly *artha* means a pur-

सूत्राणि.

वाक्यनियमात् ॥ ३२ ॥ (पू० २.)

**पदानि** । ( मन्त्रानर्थक्यम् ) वाक्य-नियमात् ॥

**पदार्थादीनि** स्पष्टानि ।

**भावार्थः** । मन्त्रेषु वाक्यनियमो नामानुपूर्वी वर्तते । तस्मान्मन्त्रार्थेन प्रयोजनं नास्ति । नियतपदक्रमा मन्त्रा उच्चारणविशेषार्थाः ॥

---

कर्म प्रसंगी मंत्रांचा उच्चार केला म्हणजे झालें. मंत्रांचा अर्थ न समजला असतां चालेल. आतां वेदवाक्यांची योजना करून दाखवितों. हे "पुरोडाशा, मोठा हो, आणि तुझा यजमानही मुलाबाळाच्या योगानें प्रसिद्ध होवो." हा मन्त्र तैत्तिरीय संहितेमध्यें (१.१,८.) एथें येतो. तैत्तिरीय ब्राम्हणामध्य (३.२,८.) एथें हाच मन्त्र आला आहे. त्या ठिकाणीं (हा पुरोडाश) यजमानालाच संततीच्या आणि पशुसमृद्धीच्या योगानें प्रसिद्ध करतो असें संहितेंतील मंत्राच्या अर्थाचें वर्णन आहे.

पुनः "यज्ञाची ही दोरी ( त्यांनीं ) धरली" तै. सं. (४.१,२.) पुनः "यज्ञाची ही दोरी त्यांनीं धरली." म्हणजे "घोड्याचीच दोरी ते घेतात" असें या मन्त्राचें ब्राम्हणरूप तै. सं. (५.१,२.) एथें अर्थवर्णन आहे. या सर्व वरील मन्त्राचा स्पष्टपणें विनियोग सांगितला आहे. म्हणून विनियोग समजल्यानें कर्मप्रसंगीं सर्व निर्वाह होतो, आणि वेदमन्त्र फक्त उच्चारानें लागतात. वेदमन्त्र तोंडपाठ आले म्हणजे झालें, त्यांचा अर्थ समज-

pose. *Tadartha* means *that* which has adjustment for its purpose. Such an adjustment is practical application. *Shâstra* is systematic exposition. Now the sense of this sûtra can be easily stated. Because the practical application of Vaidika texts to sacrificial works is thoroughly explained in systematic treatises (such as Brâhmana and Kalpa-sûtras,) there is no necessity of knowing the meaning of the Vaidika texts, that is, the last are to no purpose. This is the meaning of this sûtra in which an objection is brought against Jaimini who holds that the thorough knowledge of Vaidika texts is essential to the performance of a sacrifice, while his opponent maintains that mere repetition of Vaidika texts is enough for the purpose of a sacrifice, and that it is not necessary to understand their meaning. Now the translation and application of the Vaidika texts already quoted. "Oh sacrificial cake ! prosper, and let thy sacrificer prosper in children (and cattle.) This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 1, 8.) and again in the Taittirîya Brâhmana where the sense of the Sanhitâ text is thus enlarged :—"This

**३२. (वेदांतील) वाक्यांत नियम असतो, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० २.)**

32. (The sense of Vaidika texts is to no purpose) because (there is) a fixed rule (in Vaidika texts). (11. Statement of the opponent.)

---

ज्याची मुळींच अवश्यकता नाहीं. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

३२. "वाक्य आणि नियम" असे दोन शब्द आहेत. त्यांचा अर्थ करतांना भाष्यकार असें वर्णन करतात कीं, वेदांतील शब्दरचना कधीं न बदलेल अशी बांधली आहे. मंत्रामध्यें वर्ण व पदें ज्या क्रमानें अढळतात तो क्रम तशाचा तसाच राहिलाच पाहिजे, असा नियम आहे. मंत्राच्या अर्थांत जर तात्पर्य असतें, तर क्रमावर एवढा कटाक्ष ठेवला नसता. परंतु ज्या अर्थी मंत्रांचा वर्णक्रम आणि पदक्रम कधीं बदलत नाहीं, व या नियमाकडे विशेष लक्ष आहे, त्या अर्थी मंत्राचा अर्थ समजावा असा हेतुच नाहीं. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे. एकामागून एक वर्ण व एकामागून एक पदें आलींच पाहिजेत, असा अर्थ दाखविणारा संस्कृतांत आनुपूर्वी हा शब्द आहे.

sacrificial cake distinguishes the sacrificer by his children and cattle." Again, "they took this rope of the sacrifice" occurs in the Taittirîya Sanhitâ (IV. 1, 2.) The expression—" they took this rope of the sacrifice"—is explained in the Taittirîya Sanhitâ (V. 1, 2.) which is properly speaking a Brâhma*na*. The practical application of the texts in the Sanhitâ is thoroughly explained. And sacrificial works can be performed when the practical application of Vaidika texts is known, while the repetition of Vaidika texts is essential to the performance of a sacrifice. It is sufficient then merely to get up Vaidika texts by heart by mere rote. There is no necessity whatever to understand them. This is the gist of this statement of the opponent.

32. The two terms Vâkya and Niyama are used in the original sûtra. Commentators in explaining them state that syntactical sequence of words in the Vedas is immutably fixed. The rule is that the order in which letters as well as words in Vaidika texts occur is to be permanently maintained. If the sense of Vaidika texts were essential, such importance would not be attached to mere mechanical sequence of words. But as the sequence of letters and words in Vaidika texts is never to be altered, and as special attention is

सूत्राणि.

**बुद्धशास्त्रात् ॥ ३३ ॥ (पू० ३)**

**पदानि ।** (मन्त्रानर्थक्यम्) बुद्ध-शास्त्रात् ॥

**पदार्थः ।** बुद्धम्=ज्ञानम् । शास्त्रम्=निदर्शनम् ॥

**वाक्यार्थः ।** यज् ज्ञातं तस्य निदर्शनं क्रियते । अत एवोच्चारणविशेषार्था मन्त्राः ॥

**भावार्थः ।** ज्ञातनिदर्शने नाम ज्ञातज्ञापने पुनरुक्तिदोषः प्राप्नोति । अतो मन्त्रस्य ज्ञाने पर्यवसानं नास्ति । क्व तर्हि । उच्चारणविशेषे ॥

**अविद्यमानवचनात् ॥ ३४ ॥ (पू० ४)**

**पदानि ।** (मन्त्रानर्थक्यम्) अ-विद्यमान-वचनात् ॥

**पदार्थः ।** अविद्यमानम्=यन् नास्ति तत् । वचनम्=प्रतिपादनम् ॥

**वाक्यार्थः ।** यत् (कुत्रापि नास्ति) तस्य प्रतिपादनादुच्चारणविशेषार्था मन्त्राः ॥

**भावार्थः ।** शशशृङ्गं कुत्रापि न वर्तते । शशशृङ्गवदनेकार्था वेदे वर्तन्ते अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारणे तात्पर्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

च॒त्वारि॒ शृङ्गा॒ त्रयो॑ अस्य॒ पादा॑ द्वे शी॒र्षे स॒प्त हस्ता॑सो अस्य । त्रिधा॑ ब॒द्धो वृ॑ष॒भो रो॑रवीति म॒हो दे॒वो मर्त्याँ॒ आवि॑वेश ऋ० सं० (४. ५८,३) मा मा हिंसीः ॥

---

paid to this rule of sequence, it is never intended that the sense of Vaidika texts should be understood. This is the gist of this statement in opposition. The invariable sequence of letters or words is expressed in Sanskrita by the word Ânupûrvî.

**३३. जें ठाऊक आहे, त्याचेंच प्रतिपादन असतें, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ३.)**

33. (The sense of Vaidika texts is to no purpose) for there is the explanation of that which is already known. ( III. Statement of the opponent.

**३४. कोठें जें नाहीं, त्याचें वर्णन (वेदांत) असतें म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ४.)**

34. (The sense of Vaidika texts is to no purpose) because (there is in the Vedas) the discription of that which (never and) no-where exists. ( IV. Statement of the opponent.)

---

३३. मूळ संस्कृत सूत्रांत "बुद्धशास्त्रात्" असें पद आहे. "बुद्ध" म्हणजे जें ठाऊक आहे तें. "शास्त्र" म्हणजे व्यवस्थित वर्णन. जें समजलें आहे त्याचें वर्णन करणें यांत पुनरुक्तिदोष येतो. हा दोष वेदमन्त्रांवर येऊं नये म्हणून वेदमन्त्र तोंडानें पाठ मात्र म्हणावेत, त्यांचा अर्थ समजून घेण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. "हे अग्नीद् (अग्नीला पेटविणाऱ्या) हे अग्नीद्, विहार कर," असा एक वेदाचा मंत्र आहे. याचा अर्थ समजून करायाचें काय? काय करायाचें तें अग्नीदाला ठाऊक असतें. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

३४. सूत्राचा अर्थ एवढाच आहे कीं जसें सशाचें शिंग कोठेंहि मिळत नाहीं, तसें वेदांत वर्णन केलेले अर्थ कोठेंहि दिसत नाहींत. याकरितां त्या अर्थाचें ज्ञान होण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. नुस्ते ते

33. The phrase Buddha-Shâstrât is used in the original Sauskrita sûtra. *Buddha* means that which is known. Shâstra as has been stated, is systematic exposition. It is mere tautology to explain what is known. To ward off tautology it is reasonable to infer that Vaidika texts are merely to be remembered, while there is no necessity whatever for understanding them. "Oh Agnîd, oh Agnîd! prepare the sacrificial ground called Vihâra." (Agnîd is etymologically one who kindles fire). This is a Vaidika text probably from what is called a chapter on sacrificial directions (Praisâdhyâya). Now the question is what is the good of knowing the sense of such a text? The priest Agnîd knows what he has to do, and he does it. This is the drift of this statement in opposition.

34. The sûtra simply means that as a horn of a hare no-where exists, so the objects mentioned in the Vedas no-where exist.

## सूत्राणि.

### अचेतनेऽर्थबन्धनात् ॥ ३५ ॥ (पू० ५)

**पदानि** । (मन्त्रानर्थक्यम्) अ-चेतने, अर्थ-बन्धनात् ॥

**पदार्थः** । अचेतने=नास्ति चेतना नाम ज्ञानं यस्य तस्मिन् । अर्थः= विनियोगः । बन्धनात्=प्रतिपादनात् ॥

**वाक्यार्थः** । यस्य ज्ञानं नास्ति तद्विषये क्रिया प्रतिपादिता । अतएवो-च्चारणार्था मन्त्राः ॥

**भावार्थः** । अज्ञानिषु ज्ञानमूलकक्रियाकारित्वप्रतिपादनान् मन्त्राणा-मर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि केवलोच्चारणे ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

ओषधे त्रायस्वैनम् ॥ तै॰ सं.(१.२,१) शृणोत ग्रावाणो विदुषोनु तै. सं. (१.३,१३)

---

मंत्र तोंडानें पाठ म्हटले म्हणजे झालें. यास वेदांतील उदाहरण. "चार शिंगें, तीन याचे पाय, दोन मस्तकें, याचे सात हात. तीन ठिकाणीं बांधलेला वृषभ ओरड ओरड ओरडतो. मोठा देदीप्यमान मरणाऱ्यांत शिरला." अशा ऋक्संहितेंत (४.५८,३.) येथें मंत्र आहे. पण चार शिंगाचा आणि तीन पायांचा प्राणी कोठें आहे, आणि ऋग्वेद काय वर्णन करतो ? तर असला भलभलता अर्थ समजून घेण्यापेक्षां वेदाचे मंत्र तोंडानें पाठ म्हणावे, आणि मुकाट्यानें यज्ञसमयीं त्यांचा विनियोग करावा, हें बरें. पुनः "हे मेखले, मला मारूं नको." हा मन्त्र तै. सं. (१.२,२,३.) एथें आहे. दीक्षणीयेष्टीमध्यें कृष्णाजिनादिदीक्षा देतांना जें कर्म करावें लागतें, तत्संबंधीं कंमरेस मे-

Therefore, there is no use whatever of knowing their sense. It is quite sufficient to get them up by heart by means of mere rote. A Vaidika text by way of illustration. "Four horns, his three feet, two heads, his seven arms, an ox tied in three places roars and roars, the great resplendent entered the mortals." This text occurs in the *R*ik-Sanhitâ already given. Instead of attempting to understand such absurd Vaidika texts, it is reesonable to get them up by heart by mere rote and quietly apply them to sacrificial purposes. Again—"oh (girdle) do not kill me" This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 2, 3.) A girdle is to be tied to the waist of a sacrificer at the time of performing what is called Dîksa*n*îyesti where the sacrificer is regularly initiated. At this time, the

**३५. ज्यांना ज्ञान नाहीं, अशांविषयीं कर्माचें प्रतिपादन केलें आहे, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ५.)**

**35. (The Vedas are to no purpose) because objects incapable of knowing are described (as performing sacrifices). (v. Statement of the opponent.)**

---

खला बांधावी लागते. त्यावेळीं "हे मेखले०" हा वरील मंत्र येतो. मेखला हिंसा करणार कशी? तर असले भलते भलते अर्थ समजून घेण्यापेक्षां मन्त्र तोंडपाठ करावेत, आणि यज्ञाचे वेळीं ते म्हणावेत, हें बरें. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

३५. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. "हे ओषधे, त्याचें त्राण कर." तै. सं. (१.२,१.) "हे दगडानो, तुम्ही विद्वान् आहां म्हणून ऐका." तै. सं. (१. ३,१३.) पूर्वपक्षकार असें विचारतो कीं, दगड ऐकणार कसे? दगड विद्वान् होणार कसे? ओषधी त्राण करणार कशी? हे असले भलभलते, अप्रयोजक, असंभाव्य अर्थ समजून घेण्यापेक्षां फक्त वेदमंत्र तोंडपाठ करावेत हें बरें. त्यांच्या अर्थाविषयीं भानगड करून उपयोग नाहीं. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

text referred to is pronounced. How can a girdle kill a sacrificer? Instead of attempting to know such absurd texts, it is reasonable to learn the texts by mere rote and quietly to use them in a sacrifice without understanding their sense. This is the gist of this statement in opposition.

35. An illustration will explain the sûtra. "Oh vegetable, save him." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 2, 1.) "Being learned, oh, stones! listen." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 3, 13.) The opponent asks—how can the stones listen and how can they be learned? How can a vegetable save man? Instead of knowing the sense of such absurd texts, it is reasonable to get up the texts by heart by mere rote. There is no use in endeavouring to know their sense. This is the gist of this statement of the opponent.

सूत्राणि.

**अर्थविप्रतिषेधात् ॥ ३६ ॥ (पृ० ६)**

**पदानि** । (मन्त्रानर्थक्यम्) अर्थ-विप्रतिषेधात् ॥

**पदार्थः** । अर्थः=प्रतिपादितविषयः । विप्रतिषेधात्=विरुद्धोपन्यासात् ॥

**वाक्यार्थः** । विषयस्य विरुद्धोपन्यासादुच्चारणार्था मन्त्राः ॥

**भावार्थः** । एकस्य विषयस्यैककालीनो विरुद्धोपन्यासो दृश्यते । यथा अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षम् । अस्मिँलक्ष्येऽदितेर्द्योत्वेन वाऽन्तरिक्षत्वेन युगपद् वर्णनं कृतम् । तद् विरुद्धम् । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारे तात्पर्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

अदि॑तिर्द्यौरदि॑तिर॒न्तरि॑क्ष॒म् । वाजसनेयसंहिता (२५,२३.) ॥ एक॑ ए॒व रु॒द्रो न द्वि॒तीया॑यतस्थे । तै. सं. (१.८,६.) स॒हस्रा॑णि सहस्र॒शो ये रु॒द्रा अधि॒ भूम्या॑म् ॥ तै. सं. (४.५,११)

**स्वाध्यायवदवचनात् ॥ ३७ ॥ (पृ० ७.)**

**पदानि** । (मन्त्रानर्थक्यम्) स्वाध्यायवत्-अ-वचनात् ॥

**पदार्थः** । स्वाध्यायवत्=स्वाध्यायवतः । अवचनात्=अर्थस्याप्रतिपादनात् ॥

**वाक्यार्थः** । स्वाध्यायकर्मसम्बन्धिनो ये मन्त्रास्तेषामर्थप्रवचनं न क्रियते । अत उच्चारणार्था मन्त्राः ॥

**भावार्थः** । स्वाध्यायाध्ययनस्य कर्मार्थित्वाद् यत् कर्मण्युपयोक्ष्यते तदभ्यसितव्यम् । तच् चैवं विद्वांसः सन्तो वृद्धाः शिष्यानक्षरावधारण एव प्रवर्त्तयन्ति । सन्निहितेऽप्यर्थे न तद्वचनाभ्यासे । तेनावश्यं तेषामुच्चारणमेवाङ्गत्वेनाभिप्रेतमिति कुमारिलभट्टः परिपाटीं दर्शयाति । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारे तात्पर्यम् ॥

**३६. ज्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे, त्याच विषयाचा विप्रतिषेध होतो, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ६.)**

**३७. (स्वाध्यायकाळीं) स्वाध्यायकर्मसंबंधी मंत्राचें अर्थप्रतिपादन नाहीं, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ७.)**

36. (The Vedas are to no purpose) because there are in it contradictory statements on the same subject. (VI. Statement of the opponent.)

37. (At the time of learning under a preceptor as prescribed by sacred canons) the sense of the texts (in this connection) is never taught, therefore, (the Vedas are to no purpose.) (VII. Statement of the opponent.)

---

३६. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. "अदिति आकाश आहे, अदिति वायुमंडल आहे." हा मंत्र वाजसनेय संहिता (२५.२३.) एथें आला आहे. त्या ठिकाणीं अदितिच आकाश, आणि अदितिच वायुमंडल असें वर्णन आहे. हें कसें? एकाच मंत्रामध्यें एकमेकांशीं न जुळणाऱ्या अर्थांचें वर्णन केलें आहे. हें कसें? दुसरें एक उदाहरण घ्या. "रुद्र (जगतामध्यें) एकच आहे, दुसरा रुद्र कोणीहि नाहीं." असा मंत्र तै. सं. (१.८,६.) एथें आहे. पुनः "हजारोंच्या हजारो जे रुद्र भूमीवर आहेत." असा मंत्र तै. सं. (४.५,११.) एथें आहे. या मंत्रामध्यें जे अर्थ वर्णिले आहेत, ते परस्पर विरुद्ध आहेत. वेदाच्या अर्थावर तात्पर्य आहे असें म्हटलें, तर जो विरोध आम्ही दाखविला तो अंगावर येतो म्हणून वेदाचे अर्थ करण्याची अवश्यकता नाहीं. केवळ वेद तोंडपाठ केले म्हणजे झालें. आणि तोंड-

36. An illustration will explain the sûtra. "The firmament is infinity, and the heavens are infinity." This text occurs in the Vâjasaneya Sanhitâ (25, 23.) How can two things like the firmament and the heavens be infinite at the same time? How are such contradictory statements made in the same text? Take another example :—"There is only one Rudra (in the universe) and there is none second." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 8, 6.) Again the text, "there are thousands of Rudras on the earth" occurs in the Taittirîya Sanhitâ (IV. 5, 11.) These texts are evidently contradictory. If it be said that the knowledge of the sense of Vaidika texts is important, the contradictions, says the opponent, are inevitable and have to be admitted. The latter proposal of merely remembering them obviates all the objections based on the texts being self-contradictory; because, when there is no knowledge of

## सूत्राणि.

### अविज्ञेयात् ॥ ३८ ॥ (पू० ८.)

**पदादीनि** स्पष्टानि ।

**वाक्यार्थः** । केचिन् मन्त्रा ज्ञातुं न शक्यन्ते । अतएव तेषामानर्थक्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

सृण्येव जर्भरी तुर्फरीतू नैतोशेव तुर्फरी पर्फरीका ॥ ऋ. सं. (१०.१०६,६.) अम्यक्सा त इन्द्र ऋष्टिरस्मे सनेम्यभ्वं मरुतो जुनन्ति ॥ ऋ. सं. (१.१६९,३.) इन्द्रः सोमस्य काणुका ॥ ऋ. सं. (८.७७,४.)

---

पाठ मन्त्र केले म्हणजे मन्त्रामन्त्राच्या अर्थांत जो विरोध आढळतो त्यापासून कांहींच अडचण उत्पन्न होणार नाहीं. म्हणून वेदाचा अर्थ करणें निरुपयोगी आहे, व वेद तोंडपाठ करणें हें सयुक्तिक आहे.

३७. कोणीहि पुरुष गुरुपाशीं अध्ययन करतेवेळीं मन्त्र तोंडपाठ मात्र करतो, त्यांत ज्या क्रियेचें वर्णन केलें असतें तशी क्रिया हातानें करीत नाहीं. किंवा ती क्रिया कशी करावी हें समजूनहि घेत नाहीं. केवळ एकामागून एक मंत्र तोंडपाठ करतो. म्हणून वेद तोंडपाठ करण्याचीच परिपाठि आहे. या करितां वेदमंत्र तोंडपाठ करावेत. अर्थ समजून घेण्याची अवश्यकता नाहीं. ही वेद तोंडपाठ करण्याची परिपाठि आहे असें पूर्वपक्षकार म्हणतो. पण ही परिपाठि केवळ जैमिनीच्याच वेळीं उत्पन्न झाली होती असें

the texts themselves, there can be no knowledge of their being self contradictory. The meaning of Vaidika texts is, therefore, unnecessary. It is reasonable to get up the Vedas by heart by means of mere rote.

37. A student, while with his preceptor, only learns to repeat Vaidika texts, and never actually performs the works described in them nor does he learn the way in which the works are to be performed, but quietly learns to repeat the texts in order. From this practice it is to be inferred that it has been a custom to learn only to repeat Vaidika texts. The custom proves that Vaidika texts are to be repeated without any knowledge of their sense. There is no necessity whatever of apprehending their sense. The opponent says that it is a custom to get up Vaidika texts by heart. Now, this custom did not come into existence just at the time of

**३८. (कांहीं मंत्राचा) अर्थ समजणें अशक्य, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन) (पू० ८.)**

38. (The Vedas are to no purpose) because it is impossible to know the sense (of some Vaidika texts.) (VIII. Statement of the opponent.)

नाहीं. ही परिपाठि फार प्राचीन आहे, असे दिसतें. ऋ. सं. (१.१६४,३९.) एथें हा मंत्र पहावा. "ऋचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः। यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते॥" या मंत्राचा अर्थः—ऋचेचा उत्तम (अविनाशी) अक्षररूप जो स्वर्ग, त्यामध्यें सर्व देव वास करतात. हें जो न जाणतो तो (नुस्त्या) ऋचेनें काय करील? जे असेंच जाणतात ते हे असा वास करतात. पुनः, यास्काचार्य आपल्या निरुक्तांत असें म्हणतात कीं जो अर्थ न जाणतो, पण वेद तोंडपाठ करतो तो केवळ भार वाहणारा खांब आहे.

या वचनांवरून पूर्वी वेद तोंडपाठ करण्याची परिपाठि होती, त्याच परिपाठीस अनुलक्षून पूर्वपक्षकारानें पूर्वपक्ष केला आहे. शबरानें एक उदाहरण दिलें आहे, त्यांत " पूर्णिका कांडते, माणवकनामक विद्यार्थी तिच्यापाशीं मन्त्राचें अध्ययन करतो. त्याला मन्त्राचा अर्थ काय हें समजून घेण्याची इच्छा नाहीं. ती पूर्णिका स्त्री त्याला सांगत नाहीं, कारण तिला ठाऊक नाहीं." अशा प्रकारच्या कथेचें दिग्दर्शन आहे. माधवानें याच कथेचा चांगला उल्लेख केला आहे. सर्व भाष्यकार ही कथा कां सांगतात हें आम्हांस समजत नाहीं. वेदमन्त्र नुस्ते पाठ करण्या-

Jaimini. It appears that it is an ancient custom. See the *R*ik Sanhitâ (I. 164, 39.), where the following text occurs:—"In eternal heaven (as it were) of a verse, all the gods abide. What can he who does not know this do with a (mere) verse? Those only who know this, thus abide." There is evidently a pun on the word Aksara in this text. Again Yâska in his Nirukta says that " he who learns merely to repeat the Vedas is like a post which only bears a burden." These texts prove that the practice of repeating Vaidika texts without knowing their sense existed and was recognized long before the time of Jaimini. The opponent who bases his objection on an ancient custom is one of those who preferred repeating to learning the Vedas. Commentator Shabara gives the following illustration:—A woman named Pûr*n*ikâ pounds in a mortar. A student named Mâ*n*avaka learns there. He does not care to know the sense of what he repeats. Pûr*n*ikâ does not explain it to him for she does not know it." We do not see why all commentators tell this story. The purport of the sûtra seems to be to found an argument on the existence of an ancient custom.

38. There are such Vaidika texts as none can understand. It is, therefore, unreasonable to attempt to know their sense. It is, therefore, necessary to learn to

## सूत्राणि.

**अनित्यसंयोगान् मन्त्रानर्थक्यम् ॥ ३९ ॥ (पू० ९.)**

**पदार्थः** । अनित्यसंयोगात्=अनित्यस्य संयोगः अनित्यसंयोगः तस्मात् । मन्त्र-आनर्थक्यम्=मन्त्राणामनभिधानार्थता ॥

**वाक्यार्थः** । अनित्यार्थानां सम्बन्धान् मन्त्राणां किंचिदभिधानार्थता नास्ति ॥

**भावार्थः** । वेदेऽनित्यवस्तूनां वर्णनमस्ति तस्माद् वेदार्थानामनित्यता । अतो वेदार्थेषु कालक्रमोऽवगम्यते । कालक्रमादननुभूतपूर्वत्वम् । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारणे तात्पर्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

किं ते कृण्वन्ति कीकटेषु गावो नाशिरं दुह्रे न तपंति घर्मं । आ नो भर प्रमंगंदस्य वेदो नैचाशाखं मघवन् रंधया नः । ऋ.सं. (३.५३,१४.)

---

विषयीं प्राचीन परिपाठीपासून अनुमान काढावें, एवढाच या सूत्राचा आशय दिसतो.

३८. वेदांत कांहीं कांहीं मन्त्र आहेत, त्यांचा अर्थ कोणालाहि होत नाहीं. म्हणून वेदमन्त्रांचा अर्थ करणें हें सयुक्तिक नाहीं. म्हणून नुस्ते वेदमन्त्र तोंडपाठ करावेत, असें पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे. आतां, त्यांचा अर्थ कधींहि होणार नाहीं असे मन्त्र तरी कोणते? असें विचारलें तर संस्कृत सूत्राखालीं वेदवाक्यांचें अनुसंधान अशी सदर घालून वेदमन्त्र दिले आहेत, ते पहावे. तेथें फक्त नमुन्या करतां दोन तीन मन्त्र घेतले आहेत. अशा मन्त्रांचा अर्थ बसविण्याकरतां

repeat Vaidika texts from memory. This is the gist of this statement of the opponent who mentions such Vaidika texts as can not be understood. Such texts are quoted by way of illustration, in the Sanskrita portion of this work. Different commentators have endeavoured to discover and settle the meaning of the texts. But it is rather too much to say that their endeavours have been crowned with success. We have already mentioned that the school of those who insist on the Vedas being to no purpose is ancient. The Naigama K*â*n*d*a of the Nirukta of Yâska throws light on the history of this school. Âchârya Kou*t*sa argues that the Vedas have no sense. In the course of his arguments, he

## ३९. नाशवन्त वस्तु वेदांत आढळतात, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ९.)

39. (The sense of the Vedas is to no purpose,) because transitory objects occur in the Vedas. (IX. Statement of the opponent.)

---

भाष्यकारांनीं पुष्कळ खटपट केली आहे. परंतु ती खटपट सफल झाली असें म्हणण्यास जरा कठीण खरें. वेद अनर्थक आहेत, असें म्हणणाऱ्या पंडितांचा सांप्रदाय फार प्राचीन आहे, असें आम्ही पूर्वी वर्णन केलेंच आहे. हे प्राचीन पंडित कसे होते, हें नीट समजून घेण्या करतां यास्काचार्यांनें केलेल्या निरुक्ताचें नैगमकांड (१.१५.) प्रकरण पहावें. तेथें मन्त्राला अर्थ नाहीं, असा पूर्वपक्ष कौत्सनामें पंडित करतो. आणि या पूर्वपक्षाचें प्रतिपादन करतांना त्यानें जे आठ नऊ हेतु दिले आहेत ते हेतु, आणि मीमांसा (१.२,३१–३९) सूत्रांत जे पूर्वपक्ष केले आहेत, त्यांत जे हेतु आहेत ते, हे शब्दशः जुळतात. कौत्स हा वेदार्थ नाहीं म्हणणारा, आणि कोणी उलटा वेदार्थ आहे असें म्हणणारा, या दोघांमध्यें वादविवाद आहे. त्या वादविवादावरून अति प्राचीन काळीं वेदाचे अर्थ होत नाहींत, असा पूर्वपक्ष करणारे महापंडित होते असें सिद्ध होतें. या महापंडितांचा नायक कौत्स होता. ही गोष्टहि लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पुनः गुरुपरंपरेमध्यें कौत्साचें नांव गणिलें आहे. पाणिनीच्या लेखावरून कौत्स हा मोठा प्रबळ आचार्य होता असें सिद्ध होतें. हें इतिहास-

---

lays down eight grounds which exactly correspond to the eight statements of the opponent in the foregoing sûtras (I. 2, 31-39.) Yâska who holds that Vaidika texts have some sense or other is opposed to Koutsa who holds that they are without any sense. The arguments of Koutsa place it beyond doubt that in ancient times there were rationalistic free-thinkers like Koutsa who was perhaps the leader of the Âchâryas who thought as he did. The history of Koutsa in this connection deserves attention. Again, the name of Koutsa is included in the list of renowned teachers. Pâṇini's sûtras give grounds for believing that Koutsa was a distinguished teacher about the middle of the Âchârya-period. We have given this history to show that the opponent mentioned in the sûtra is not a man of straw and that his objections are not imaginary; but that such arguments as Jaimini notices were actually advanced and rebutted.

39. We have examined the significance of the phrase—"transitory objects occuring in the Vedas" in the sûtra (I. 1, 28.) This will be fully explained again by the following example. We will translate the Vaidika text quoted in the Sanskṛita portion of this work. Oh (Indra) "What do the cows do for thee in the countries

सूत्राणि.

**अवशिष्टस्तु वाक्यार्थः ॥ ४० ॥ (सि०)**

**पदानि ।** अवशिष्टः, तु, वाक्य-अर्थः ॥

**पदार्थः ।** अवशिष्टः=निरपेक्षः । तु=न । वाक्यार्थः=वाक्यस्य अर्थः ॥

**वाक्यार्थः ।** न । वाक्यार्थो निरपेक्षः ॥

**भावार्थः ।** मन्त्राणामानर्थक्यं नास्ति मन्त्राणां सार्थता वर्तते । मन्त्राणामर्थे सफलतायां गृहीतायां न किञ्चिदन्यदपेक्षितम् । उच्चारणे सफलतायां गृहीतायां किञ्चिदप्यपूर्वरूपं फलमपेक्षितम् । सार्थत्वरूपफलं दृष्टम् । अपूर्वरूपफलमदृष्टम् । दृष्टादृष्टयोरदृष्टकल्पनाऽन्याय्या । अतोऽन्यफलनैरपेक्ष्यात् मन्त्राणामर्थे तात्पर्यम् । न तूच्चारणे ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

अग्निरसि नार्यसि । वाजसनेय संहिता (११.१०) तां चतुर्भिरभ्रिमादत्ते ॥

---

वर्णन अशाकरितां केलें आहे कीं जैमिनीच्या मीमांसेंत जे पूर्वपक्ष आहेत ते केवळ कपोलकल्पित आहेत, असें समजूं नये. असे पूर्वपक्ष पूर्वी पंडित खरोखर करीत असत व ते सर्व जमा करून जैमिनीनें आपल्या शास्त्रमालिकेंत ओवून ठेवले आहेत, असें सिद्ध होतें.

३१. नाशवंत वस्तु म्हणजे काय याचा आम्ही पूर्वीच (१.१,२८.) एथें विचार केला आहे. पुनः, उदाहरणावरून स्पष्ट होईल. आम्हीं जो मन्त्र संस्कृतांत घेतला आहे त्याचा अर्थ सांगतों "कीकट नामें नास्तिक देशामध्यें हे (इंद्रा) गाई तुझा उपयोग करतात काय ? सो-

called Kîkatas ? They do not give milk enough to prepare Soma for thee. They do not give milk sufficient to fill a vessel called a *Mahâvîra* so that we may heat it. Therefore, grant us the wealth of the prince *Pramangada* and of the country called *Naichâshâkha.*" This text occurs in the *Rik*-sanhitâ (III. 53. 14.) In the original text the verb *tapanti* is used. We are doubtful as to its meaning. In this text, the infidels—*Kîkatas*, the prince—*Pramangada* and the country called *Naichâshâkha* are mentioned. If the Vedas be eternal, all these—the infidels, the prince and the country would be eternal. But these infidels and the rest do not exist.

# पोंच.

| नांव. | रुपये. | आणे. | प्रति. |
|---|---|---|---|
| रावसाहेब रघुनाथ भास्कर गोडबोले ... ... ... ... | ५ | ० | १ |
| रा० सा० विनायकराव वासुदेव ... ... ... ... ... | ५ | ० | १ |
| रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर. ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० रा० रामचंद्र गोविंद अनगळ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रावबहादूर हरी रावजी चिपळुणकर. ... ... ... ... | ५ | ० | १ |
| Gopalji Gulabhai Desai Esquire. . ... | 5 | 6 | 1 |
| Shivalal Nathubhai Esquire... ... ... | 5 | 6 | 1 |
| Babu Aditya Ram Bhattacharya. ... | 5 | 6 | 1 |
| रावसाहेब कृष्णाजी बापूजी बाळ. ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० गोविंदराव गोरे.... ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| Arthur Oliphant Esquire... ... ... ... | 10 | 12 | 2 |
| रावसाहेब चिंतामण सखाराम चिटणीस... ... ... ... | ५ | ६ | १ |
| श्री० रा० रा० वासुदेवराव अण्णासाहेब जहागिरदार.. ... | ५ | ३ | १ |
| Sashiah Shastri Esquire ... ... ... ... | 5 | 6 | 1 |
| Sivanath Shah Esquire ... ... ... ... | 5 | 6 | 1 |
| रा० सा० विठल वासुदेव गुरजर. ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० कृष्णराव सदाशीव जोगळेकर. ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० महादेव विष्णु कार्णे. ... ... ... ... ... | ५ | ३ | १ |
| रा० सा० विष्णु बाळकृष्ण सोहोनी. ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० बापाजी बाळकृष्ण. ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० गोविंद जगन्नाथ. ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| रा० सा० शांताराम नारायण. ... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| Dr. Shivaram Bhau... ... ... ... ... | 5 | 6 | 1 |
| Rev. Robert Squires... ... ... ... ... | 5 | 6 | 1 |
| रा०सा० बाळाजी पांडुरंग.... ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| ,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी. ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| ,, ,, कारभारी संस्थान जव्हार. ... ... ... ... | ५ | ६ | १ |
| Dosabhai Framji Esquire. ... ... ... | 5 | 6 | 1 |
| K. Ramchandrarao Esquire.... ... ... | 5 | 6 | 1 |
| K. Raghunathrao Esquire. ... ... ... | 5 | 6 | 1 |

Register No. 131 of 1877.

## सूचना.

| | रुपये. | आणे. |
|---|---|---|
| वर्षाची वर्गणी, अगाऊ .. .. .. .. .. .. .. .. | ५ | ० |
| एका अंकास .. .. .. .. .. .. .. .. .. .. | ० | ८ |

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्दर्शनाचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्यावर पाठवावीं.

| | Rs. | A. |
|---|---|---|
| For one year, in Advance... ... | 5 | 0 |
| Single copies . ... ... ... ... ... ... | 0 | 8 |

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

*N. B.* The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Saddarshana*-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.